**सरकार तर्फे साक्षीदार क्र. –०८**

**नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६**
**सरकार विरुध्द सुरेश**
**निशाणी – ६८**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**माझे नांव – संजय हेमराज येवले**
**वय – अंदाजे ५५ वर्ष, व्यवसाय – हातमजूरी**
**राहणार – रमा नगर, कामठी**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती माधवी एन. जुमळे यांच्या कडून –**

मी आरोपींना ओळखत नाही. रमाकांत तिरपुडे यांचे घरापर्यत सिमेंट रस्त्याचे बाधकाम २ ते ३ दिवसापासून सन २०१६ सुरु होते. त्याचा महिना व तारीख मला माहिती नाही. त्या रस्त्यासाठी रेती, गिट्टी व सिमेंट याचा वापर होत होता. त्या रस्त्यामध्ये लोखंडाचा वापर केला गेला नव्हता. ते बांधकाम २ ते ३ दिवसात पूर्ण झाले. त्या अगोदर रहाटेच्या घराचे समोरील रस्तयाचे बांधकाम झाले होते ते किती दिवसात झाले होते याची मला माहिती नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता काय याची मला माहिती नाही.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपी क्र.१, २, ४ व ५ तर्फे वकील श्री. अढाऊ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर . आरोपी क्र.२ प्रियंका व आरोपी क्र.५ शिवदास यांचा निशाणी ६७ कडे गैरहजंरी माफीचा अर्ज वकील श्री अढाऊ यांनी दाखल केला मात्र ते गैरहजर. सबब साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र.१ व ४ स्वतः आरोपी यांनी नाकारला. सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरु –**

हे म्हणणे खरे आहे की रस्त्याचे बांधकाम कोणाचे व ते कोण करत होते याची मला माहिती नाही.

**उलटतपास नाही**.

**फेरतपासणी नाही**.

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

**स्वाक्षरी/–**
( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी

कामठी
दिनांक १२/०६/२०२४